bluebytes
news that matters

पुण्य नगरी

Friday, November 06, 2009

**Pictorial warnings on tobacco products ineffective!**

Publication: Punyanagri, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 2, Location: Bottom-Right, Width(cms): 15, Height(cms): 6, Size(sq.cms): 90

# तंबाखूजन्य उत्पादनांवरील सचित्र ताकीद प्रभावहीन!

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) - सिगारेट आणि तंबाखूजन्य उत्पादनांवरील सचित्र इशारा धुम्रपान आणि तंबाखूजन्य उत्पादनांचे सेवन करणाऱ्यांवर परिणामकारक ठरला नसल्याचे एका सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. मुंबई शहरामध्ये सप्टेंबर महिन्यात हेलिस सेख्सरिया इन्स्टिट्यूट या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सर्व्हेतून ही बाब निदर्शनास आली आहे. धुम्रपान करणारे ५० टक्के लोक आवरणावरील सचित्र इशाऱ्याला जुमानत नसल्याचे दिसून आले आहे.सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादनांची विक्री करण्यापूर्वी त्यावर वैधानिक इशारा असणे सरकारकडून मे महिन्यापासून बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार उत्पादक कंपन्यांकडून तशी दक्षता घेतली जात आहे, मात्र तो सचित्र इशारा मुंबई शहरामध्ये प्रभावहीन ठरत आहे. हेलिस सेख्सरिया इन्स्टिट्यूट या जनतेच्या आरोग्यासाठी झटणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने मुंबईतील ६१५ लोकांची मते जाणून घेतली. त्यामध्ये सिगारेटचे सेवन करणाऱ्या १३६ लोकांचा समावेश आहे. बहुतांश लोकांनी त्या सचित्र वैधानिक इशाऱ्याला कोणताही शास्त्रीय आधार नसल्याने मत व्यक्त केले आहे. परिणामी त्या लोकांनी धुम्रपानाच्या प्रमाणातही कमी बाळगलेली नाही. सचित्र इशाऱ्याऐवजी सरकारने प्रभावी मोहीम हाती घ्यावी, असे म्हणणेही अनेकांनी मांडले. दरम्यान, हेल्थ सेख्सरिया इन्स्टिट्यूट या संदर्भातील अहवाल आरोग्य मंत्रालयाकडे सादर करणार आहे.

